महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीच्या उपाध्यक्ष पदावर नेमणूक.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन आदेश क्र.आरपीए-२०१७/प्र.क्र २५८(१)/र-१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : २७ एप्रिल, २०१८.

वाचा :- १) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.एलक्यूएन.१२/२०१३/प्र.क्र. १९०/अ-२, दिनांक २७/०८/२०१४
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.आरपीए-२०१५/प्र.क्र..१९४/र-१, दि.२०/०८/२०१५,
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.आरपीए-२०१७/प्र.क्र. २००/र-१, दि.२४/१०/२०१७
४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. आरपीए-२०१७/प्र.क्र २५८/र-१, दि.२७/०४/२०१८

प्रस्तावना :-

शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. आरपीए-२०१७/प्र.क्र २५८/र-१, दि.२७/०४/२०१८ अन्वये महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण, संनियंत्रण समिती व राज्य संनियंत्रण समितीचे एकत्रिकरण करुन भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ च्या कलम ५० पोटकलम-१ नुसार महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे. सदर समितीवर उपाध्यक्ष पद निर्माण करण्यात आले असून सदर पदास मंत्री पदाचा दर्जा देण्यात आला आहे. सदर पदावर उपाध्यक्ष यांची नियुक्ती करण्याची बाब विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ च्या कलम ५० पोटकलम-१ नुसार महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीची पुनर्रचना करण्यात आली असून सदर समितीवर उपाध्यक्ष पद निर्माण करण्यात आले आहे. सदर पदावर उपाध्यक्ष म्हणून मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांनी नामनिर्देशीत केलेले श्री.माधव भांडारी यांची उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांना शासन निर्णय, वित्त विभाग क्र.शासाउ-१०.१०/ प्र.क्र.९६/ १०/सा.उ., दि.१३.०३.२०१२ मधील तरतूदीनुसार सेवा सुविधा खालीलप्रमाणे अनुज्ञेय राहतील:-

अ.क्र.	सोयीसुविधांचे स्वरुप	मंत्र्यांचा दर्जा प्राप्त उपाध्यक्ष
१	बैठकीस उपस्थित राहण्याकरिता बैठक भत्ता	रु.५००/-प्रति बैठक
२	निवासी दूरध्वनीवरील खर्च	प्रतिमाह रु.३०००/- पर्यंतच्या खर्चाची प्रतिपूर्ती

३	कार्यालयीन कामासाठी वाहन सुविधेवरील खर्च	अ) प्रशासकीय विभागाने वाहन सुविधा चालकासह उपलब्ध करुन दिल्यास इंधन व तेलावरील खर्च प्रतिवर्ष रु.७२०००/- पर्यंत मर्यादित अनुज्ञेय राहील किंवा ब) उपाध्यक्षांना स्वत:चे वाहन (खाजगी वाहन चालकासह) कार्यालयीन कामासाठी वापरण्यास अनुज्ञेयता असेल यासाठी त्यांना दरमहा रु.१०,०००/- देय राहतील किंवा क) वरील (अ) किंवा (ब) प्रयोज्य नसल्यास राज्य शासनाने जी वाहने शासकीय कार्यालयासाठी खरेदी करण्यास अनुज्ञयता दिलेली आहे त्या बनावटीची वाहने निविदा पध्दतीने दर मागवून त्या दराने द.सा.१०,००० कि.मी. च्या प्रवासाच्या मर्यादेत भाडयाने घेता येतील. ड) वरील पर्यायापैकी एका वर्षी एकच पर्याय अनुज्ञेय राहील. कोणत्याही परिस्थितीत त्यात बदल होणार नाही.
४	बैठकीनिमित्त राहण्याची सोय व किरकोळ बाबी प्रित्यर्थ सार्वजनिक उपक्रमाने करावयाचा खर्च	(अ) मुंबई येथे रु.७५०/- प्रतिदिन (ब) नागपूर, औरंगाबाद, पुणे व नाशिक येथे रु.५००/- प्रतिदिन. (क) राज्यातील इतर ठिकाणी रु.३५०/- प्रतिदिन.
५	प्रवास भत्ता व दैनिक भत्ता	(अ) समिती/परिषद/आयोगाच्या कामासाठी अनुज्ञेय वाहन सुविधेव्यतिरिक्त प्रवासासाठी शासनाच्या सचिव दर्जाच्या अधिकारी यांना शासन निर्णय, वित्त विभाग क्र.प्रवास-१०१०/ प्र.क्र. २/सेवा-५, दि.०३.०३.२०१० मधील परिच्छेद ४ नुसार लागू असलेला दैनिक भत्ता अनुज्ञेय राहतील. (ब) हे भत्ते समिती/ परिषदा/ आयोगाच्या बैठकीचा दिवस तसेच त्या बैठकीसाठी केलेल्या प्रवासापुरतेचे मर्यादित राहील. (क) समिती/ परिषदा/ आयोगाच्या बैठकीस हजर राहण्याप्रित्यर्थ वरील अनुक्रमांक (४) अनुसार संबंधित प्रशासकीय विभागाने राहण्याची/जेवणाची सोय पुरविली असेल अथवा त्यासाठी खर्च केला असेल तर अंशाकालीन उपाध्यक्षांना देय दैनिक भत्त्याचे दर हे शासन निर्णय वित्त विभाग क्र.टीआरए-१०७७/१५६/सी/एसईआर-५, दि.११.८.१९७७ च्या परि.१३ प्रमाणे परिगणित होतील.

६	दौऱ्यातील सुविधा	समिती/ परिषदा/ आयोगाच्या कामाकरीता दौऱ्यावर असल्यास शासकीय विश्रामगृहे येथे निवासाची व्यवस्था अनुज्ञेय राहील व उपलब्धतेनुसार डि.व्ही.वाहन पुरविण्यात येईल. डि.व्ही.वाहन उपलब्ध नसल्यास इतर शासकीय वाहन जिल्हाधिकाऱ्यांकडून पुरविले जाईल. सदर निवास व परिवहन व्यवस्थेबाबतच्या देयकाची प्रतिपूर्ती संबंधित प्रशासकीय विभाग करेल.
७	निवासस्थान	समिती/ परिषदा/ आयोगाच्या उपाध्यक्ष यांना भाडयाने किंवा शासकीय इमारतीमध्ये निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात येऊ नये.
८	शासकीय समारंभातील स्थान	शासकीय समारंभाच्यावेळी मंत्री यांच्यानंतरचे स्थान राहील.

प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.१३५/व्यय-१०, दि.१८/०४/२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२७१६२२३७५७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

Dayanand S Munjale

Digitally signed by Dayanand S Munjale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=831ad18b348f1d88937e4f113316b4ad736a2c6a66b967f985fda6404a710d52, cn=Dayanand S Munjale
Date: 2018.04.27 16:25:34 +05'30'

(दयानंद शं. मुंजाळे)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) श्री.माधव भांडारी, सी.डी.ओ.बरॅक नं.१, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२०.
५) मा.राज्यमंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७) सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

९) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
१२) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर,
१३) सर्व विभागीय आयुक्त,
१४) सर्व पाटबंधारे विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक,
१५) सर्व जिल्हाधिकारी,
१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य.
१७) सर्व जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
१८) सर्व कार्यासन (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१९) जलसंपदा विभाग (५ प्रतींसह), मंत्रालय, मुंबई,
२०) निवड नस्ती, कार्यासन र-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय. मुंबई.